# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.** **ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२०५८/२०२३ दि. ०७/०८/२०२३.

**विषय :- मरासुम कार्यालयातील कालबाहय उपकरणांची विक्री करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या कार्यालयीन कामकाजाकरिता मुख्यालयात काही उपकरणे खरेदी करण्यात आली सदरची उपकरणे कालबाहय झालेली असल्याने, त्यांचे योग्य ते निर्लेखीत व विल्हेवाट लावणे करीता विक्री करण्याचे प्रस्तावित आहे.

इच्छूक खरेदीदारांना महामंडळाने सोबत सादर केलेल्या उपकरणांच्या यादी, नुसार दरपत्रक तसेच जाहिराती मध्ये नमुद आवश्यक कागदपत्र सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या वरील नमुद पत्यावर दि. ०७/०८/२०२३ ते दि. ११/०८/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत पाठवावीत. नमुद शेवटच्या दिनांका नंतर येणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

उपकरणांच्या यादी करिता तसेच इतर अधिक माहिती करिता www.maharashtra.gov.in वेबसाईटला भेट द्यावी.

या प्रक्रिये संदर्भातील अंतीम निर्णय महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचा राहिल.

Sd/-

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

जा. क्र./मरासुम/प्रशासन/२०५८/२०२३ दि. ०७/०८/२०२३.

# जाहिरात

**मरासुम कार्यालयातील कालबाहय उपकरणांची विक्री करणेबाबत.**

## महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**
**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स :(०२२)२२१५१८६७.**
**ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**

## १) परिचय

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ, असुन महामंडळातर्फे महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील शासकीय/निमशासकीय/संवेदनशील/खाजगी व्यावसायिक आस्थापनांना सुरक्षारक्षकां मार्फत सशस्त्र सुरक्षा व संरक्षण पुरविले जात आहे.

महामंडळाच्या मुख्यालयातील खालील नमुद उपकरणे कालबाहय झालेली असल्याने त्यांची विल्हेवाट लावण्याच्या हेतूने सदरची उपकरणे (मोबाईल फोन) विक्री करावयाचे आहेत; त्यासाठी इच्छूक खरेदीदारांकडून निविदा मागविण्यासाठी सदरची जाहिरात देण्यात येत आहे.

## २) उपकरणांचा तपशील :-

| अ. क्र. | उपकरणांची नावे | उपकरण क्रमांक | नग संख्या | खरेदी वर्ष | उपकरणे वापरात आणल्याचे एकूण वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 5 | 6 | 7 |
| 1 | Samsung Galaxy Grand Mobile | RF1D369TWNL<br>RF1D4251CGH<br>RF1D40NQ7EK<br>RF1D40NQ7JZ<br>RF1D41RWF6F<br>RF1D4251EAE<br>RF1D40NR2VL | नग - ७ | २०१३ | ८ वर्ष |
| 2 | Samsung Galaxy Grand Mobile | RF1D343LBVX | नग - १ | २०१३ | ८ वर्ष |

## ३) महत्तवाच्या सूचना :-

कृपया, वरील उपकरणे खरेदी करणेकरीता; निविदा सादर करणेपुर्वी खालील सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

१. उपकरणे खरेदी करू इच्छीत निविदाधारकांना जाहिरातीद्वारे कळविण्यात येत आहे की, उपकरणे **'आहे त्या स्थितीत'** भंगारात विक्री करण्यात येणार आहेत. त्यास आवश्यक दुरुस्ती करून उपकरणे ताब्यात देण्यात येणार नाहीत याची खरेदीदारकांनी नोंद घ्यावी.

२. निविदा सादर करणे करीता कार्यालयाद्वारे नमुना तयार करण्यात आला असून, तो जाहिरातीच्या शेवटी प्रसिध्द् करण्यात आला आहे. सदरच्या नमुन्यातच आपले दर नमुद करून निविदा सादर करावी.

३. निविदे मध्ये कोठेही खाडाखोड/ओव्हररायटिंग/पांढरीशाही लावणे टाळावे, तसे केल्यास त्यांची निविदा रद्द करण्यात येईल.

४. उपकरणांची पहाणी तपासणी करणेकरीता तसेच उपकरणांची अधिक माहिती मिळविणेकरीता कार्यालयाच्या खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत ९.४५ AM ते ६.१५ PM मध्ये प्रशासन विभागाशी संपर्क साधावा.

५. अंतीम दिनांका नंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.

६. खरेदीदाराने निविदा सिलबंद लिफाफ्यात खालील नमुद पत्त्यावर कार्यालयीन वेळेत सादर करावीत. पोस्टाने कुरीअरद्वारे निविदा पाठविण्यात येत असल्यस नमुद दिनांका पुर्वी मरासुम कार्यालयास प्राप्त होईल याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

७. खरेदीदारकास निवड करण्यात आल्याबाबत कळविल्यानंतर आवश्यक रक्कम कार्यालयात जमा करावी; त्याची पावती घ्यावी व उपकरणाचा प्रत्यक्ष ताबा घ्यावा.

८. एकूण उपकरणांपैकी कोणत्या एका उपकरणा करीता निविदा भरावयाची आहे. याबाबत सविस्तर उल्लेख करावा.

**४) निवड प्रक्रिया :-**

१) निवड केलेल्या खरेदीदारकांस उपकरणे खरेदीच्या अटी व शर्तीसह निविदा मंजूरीचे पत्र ई-मेल तसेच पत्राद्वारे कळविले जाईल.

**५) पुरवठादारकांनी सादर करावयाची कागदपत्र :-**

१) ओळखीचा पुरावा पॅनकार्ड/आधार कार्ड/पासपोर्ट/मतदार व ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र देण्यात यावे.

२) कंपनी/फर्मच्या नावे उपकरणे खरेदी करावयाची असल्यास त्याचे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**६) निविदा पाठविणे करिता व उघडणेकरीता हजर रहावयाचे असल्यास पत्ता व दुरध्वनी क्र. :-**

पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी : (०२२)२२१५ १८४७, फॅक्स : (०२२)२२१५१८६७.

**७) महत्तवाच्या दिनांक व वेळ :-**

१. दरपत्रके सादर करण्याची पहिली दिनांक - दि. ०७/०८/२०२३ वेळ सकाळी ९.४५ पासून सुरु
२. दरपत्रके सादर करण्याची शेवटची दिनांक - दि. ११/०८/२०२३ व वेळ १८.०० वाजेपर्यंत.
३. दरपत्रके उघडणेकरीताची दिनांक - दि. १७/०८/२०२३ व वेळ ११.०० वाजता.

**सदर निवड प्रक्रिया जाहिरात कोणत्याही वेळी/कोणत्याही कारणास्तव/कोणत्याही टप्प्यावर/पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा/फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.**

Sd/-
पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक तथा सह व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,
मुंबई.

**विषय:- (1) Samsung Galaxy Grand Mobile-7 PCS (2) Samsung Galaxy Grand Mobile-1 PCS उपकरणे खरेदी करणेकरीता निविदा सादर.**

| अ. क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १ | निविदाधारकाचे नाव / कंपनी असल्यास कंपनीचे नाव | |
| २ | निविदाधारकाचा पुर्ण पत्ता | |
| ३ | निविदाधारक कंपनी असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| ४ | वरील नमुद उपकरणांपैकी कोणते उपकरण खरेदी करणार त्याचे सविस्तर नाव व नग संख्या | |
| ५ | जाहिराती नुसार उपकरणे पाहणी केल्याचा दिनांक | |

शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात जा. क्र./मरासुम/प्रशासन/ /२०२३, दि. / /२०२३ अन्वये सदरची निविदा सादर करीत आहे/आहोत. जाहिराती मध्ये नमुद अटी, शर्थी, सुचनांनुसार मी/आम्ही उपकरण ( ) (रुपये ____________________________________ फक्त) रु. /- एवढी किंमत देऊन जसे आहे; त्या स्थितीत (As is where is basis) या तत्तवावर खरेदी करू इच्छितो. सदरचे उपकरण खरेदी नंतर दुरुस्ती तसेच इतर कामकाजांकरीता होणारा सर्व खर्च मी/आम्ही स्वखर्चाने करणार आहे./आहोत.

जाहिराती मधील नमुद सर्व सुचना, अटी व शर्ती मला/आम्हाला मान्य आहेत.

आपला विश्वासू

नाव व निविदाधारकाची सही
संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक

**टीप :-** उपरोक्त (कंस) असलेल्या जागी उपकरणाचे सविस्तर नाव व नग संख्या नमुद करणे व सर्व उपकरणे खरेदी करावयाची असल्यास त्यांची सविस्तर नावे नमुद करणे अनिवार्य आहेत. कोणतेही एक उपकरण खरेदी करणार असल्यास त्यांचे नाव व नग संख्या नमुद करणे अनिवार्य आहे.